अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-३०
दुरध्वनी क्र.- ०२२-२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :— २९/०२/२०२४

# —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०७/२०२४ |
| कलम | कलम ७, १३(१)(अ)सह १३(२) भ.प्र.अधिनियम (सुधारीत) १९८८ सह कलम १२०(ब),४०३, ४०९,४२०, ४६५, ४६७, ४६८,४७१ भा.द.वि. |
| आरोपी लोकसेवक | श्री. अमित गिरीधर लाळगे वय ४४ वर्षे धंदा:- नोकरी विक्रीकर अधिकारी, तत्कालीन नेमणूक: वस्तु व सेवाकर विभाग,जीएसटी भवन,माझगाव मुंबई व इतर १६ करदाते ट्रेडर्स संबंधित व्यक्ती |
| गैरव्यवहार केलेली रक्कम | रूपये १७५,९३,१२,६२२/- |
| थोडक्यात माहिती | लोकसेवक अमित गिरीधर लाळगे, विक्रीकर अधिकारी यांचेकडे MUM-BCP-C-20 आणि MUM-BCP-C-26 घाटकोपर विभाग,नोडल ११,माझगाव, मुंबई चा पदभार असताना माहे ऑगस्ट २०२१ ते माहे मार्च २०२२ दरम्यान एकुण १६ करदात्यानी त्यांचे व्यवसायाचे ठिकाणांचे बनावट व खोटे भाडेकरारपत्र सादर करून जीएसटीएन क्रमांक प्राप्त केले व त्यानंतर सदर करदात्यांनी शासनास कोणताही कर भरणा केला नसतानाही एकुण रूपये १७५,९३,१२,६२२/- करपताव्यासाठी ३९ करपरतावे अर्ज सादर केले होते.<br><br>सदर करपरतावे अर्जावर जाणुनबुजुन कोणतीही शहानिशा न करता तसेच सदर करदाते हे बनावट असल्याचे जीएसटी पोर्टलवरील बीओ सिस्टीम मध्ये दिसत असतानाही लोकसेवक अमित लाळगे यांनी सदर करपरतावे अर्ज नामंजुर करण्याऐवजी पदाचा गैरवापर करून नमुद करदात्यांशी संगनमत करून फौजदारीपात्र कट रचून बनावट व खोटया अहवालाद्वारे स्वत:च्या व १६ करदात्यांच्या फायदयासाठी अपात्र परतावा मंजुर करून नमूद १६ करदात्यांना रूपये १७५,९३,१२,६२२/- वितरीत करून शासनाची फसवणुक व आर्थिक हानी केली म्हणुन आलोसे अमित गिरीधर लाळगे, विक्रीकर अधिकारी व संबधित परतावा प्राप्त करणा-या १६ कंपन्याशी संबधित व्यक्ती विरोधात कलम ७, १३(१)(अ)सह १३(२) भ.प्र.अधिनियम (सुधारीत) १९८८ सह कलम १२०(ब),४०३, ४०९,४२०, ४६५, ४६७, ४६८,४७१ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. भागवत सोनावणे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहनकरण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :— **acbmaharashtra.gov.in,** **ईमेल** :— **acbwebmail@mahapolice.gov.in**
ईमेल :— **addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
फेसबुक :— **www.facebook.com - Maharashtra ACB**
मोबाईल ॲप :— **www.acbmaharashtra.net**